# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक:27.04.2024** **वार:शनिवार**

---

1. उष्णतेच्या लाटेतही लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात सरासरी 60 पूर्णांक 96 शतांश टक्के मतदान
2. महाराष्ट्रात किरकोळ अपवाद वगळता मतदान शांततेत. सरासरी 59 पूर्णांक 63 शतांश टक्के मतदानाची नोंद
3. नागालँडमध्ये महापालिका निवडणुकांची घोषणा, यंदा राज्यात पहिल्यांदाच 33 टक्के महिला आरक्षणासह होणार निवडणुका
4. तैवानमध्ये पुन्हा मोठा भूकंप आणि
5. मणिपूरमध्ये सशस्त्र हल्लेखोरांनी केलेल्या गोळीबारात सीआरपीएफच्या दोन जवानांना वीरमरण

**मतदान-दुसरा टप्पा**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात काल सायंकाळी 7 वाजेपर्यंत सरासरी 60 पूर्णांक 96 शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. उष्णतेची लाट असतानाही विविध वर्गातील नागरिकांनी उत्साहानं मतदान केल्याचं चित्र अनेक मतदान केंद्रांवर पहायला मिळालं. कालच्या दुसऱ्या टप्प्यात 13 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधील लोकसभेच्या 88 जागांसाठी बहुतांश शांततेत मतदान पार पडलं. यामध्ये केरळमधल्या वीस, कर्नाटकातल्या 14, राजस्थानातल्या 13, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशातल्या प्रत्येकी आठ, मध्य प्रदेशातल्या सहा, आसाम आणि बिहारमधील प्रत्येकी पाच, पश्चिम बंगाल आणि छत्तीसगडमधल्या प्रत्येकी तीन आणि मणीपूर, त्रिपुरा आणि जम्मू-काश्मीरमधील प्रत्येकी एका जागेचा समावेश आहे. दुसऱ्या टप्प्यात मध्यप्रदेशातल्या बेतुल लोकसभा मतदार संघाचाही समावेश होता, मात्र या मतदारसंघातल्या बसपाच्या उमेदवाराचं निधन झाल्यानं, तिथं आता तिसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे.

**महाराष्ट्र-मतदान**

महाराष्ट्रात, दुसऱ्या टप्प्यातलं मतदान काल काही किरकोळ अपवाद वगळता शांततेत पार पडलं. संध्याकाळी 6 वाजेपर्यंत सरासरी 59 पूर्णांक 63 शतांश टक्के मतदान झाल्याचं निवडणूक यंत्रणेनं कळवलं आहे. बुलडाण्यात 58 पूर्णांक 45, अकोलात 58 टक्के, अमरावतीमध्ये 60 पूर्णांक 74 टक्के, वर्धा इथं 62 पूर्णांक 65 टक्के, यवतमाळ-वाशिममध्ये 57 टक्के, हिंगोलीमध्ये 60 पूर्णांक 79, नांदेडमध्ये 59 पूर्णांक 57, तर परभणी मतदारसंघात सुमारे 60 टक्के मतदानाची नोंद झाली.

**प्रचार**

दरम्यान सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांसाठी आता प्रचाराला आणखी वेग आला आहे. प्रमुख राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते प्रचार सभांसाठी संपूर्ण देश पिंजून काढत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक आणि खासदार धैर्यशील माने यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज कोल्हापुरात सभा होत आहे.

**अर्ज**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याची अधिसूचना जारी झाल्यानं कालपासून त्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. पाचव्या टप्प्यात सहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधल्या 49 मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. त्यामध्ये उत्तर प्रदेशातल्या 14, महाराष्ट्रातल्या 13, पश्चिम बंगालमधल्या सात, ओडिशा आणि बिहारमधल्या प्रत्येकी पाच,

झारखंड मधल्या तीन तसंच जम्मू-काश्मीर आणि लडाख मधल्या प्रत्येकी एका जागेसाठी मतदान होईल. पाचव्या टप्प्यासाठी 3 मे पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. या टप्प्यात 20 मे रोजी मतदान होणार आहे. याशिवाय ओडिशा विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीही उमेदवारी अर्ज भरण्यास कालपासून सुरुवात झाली.

**<u>वीवीपॅट</u>**

निवडणूक यंत्रावर मतदान केल्यानंतर मतदारांना मिळणारी पोचपावती अर्थात व्होटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल म्हणजेच, VVPAT चिठ्ठयांची इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात नोंदवलेल्या आकडेवारीशी, 100 टक्के पडताळणी करण्याची मागणी करणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयानं काल फेटाळल्या. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठानं हा निकाल दिला. या प्रकरणांवरील आदेश 18 एप्रिल पर्यंत राखून ठेवलेला असला तरी, खंडपीठाला निवडणूक आयोगाकडून काही तांत्रिक स्पष्टीकरण हवं असल्यानं ते प्रकरण 24 एप्रिल रोजी पुन्हा सुनावणीच्या यादीत समाविष्ट करण्यात आलं आहे. तथापि सर्वोच्च न्यायालयानं निवडणूक आयोगाला दोन निर्देश दिले आहेत. मतदान यंत्रांवर निवडणूक चिन्हं लोड केल्यानंतर चिन्ह लोड करण्याची यंत्रणा सील करून ती पेट्यांमध्ये बंद करून ठेवावी, उमेदवारांची आणि त्यांच्या प्रतिनिधींची सीलवर स्वाक्षरी घ्यावी, निकाल जाहीर झाल्यानंतर निवडणूक यंत्रांसह सीलबंद पेट्या किमान 45 दिवस गोदामात ठेवाव्यात, असे निर्देश न्यायालयानं दिले आहेत.

**<u>नागालँड-निवडणूक</u>**

एकीकडे देशभरात लोकसभा निवडणुकांची धामधूम सुरू असताना नागालँडमध्ये येत्या 26 जून रोजी सर्व 39 नगरपालिका आणि नगर परिषदांच्या निवडणुका होणार आहेत. राज्य मंत्रिमंडळानं काल झालेल्या बैठकीत या निवडणुकांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. नागालँडमध्ये या महापालिका निवडणुका पहिल्यांदाच 33 टक्के महिला आरक्षणासह होणार आहेत. उमेदवारी अर्ज भरण्याचा कालावधी 7 ते 11 जून दुपारी 3 वाजेपर्यंत असून 20 जून ला अर्ज मागे घेता येतील तर 13 जून रोजी उमेदवारी अर्जांची छाननी होणार आहे आणि 26 जूनला मतदान तर 29 जूनला मतमोजणी होऊन निवडणुकांचा निकाल जाहीर होईल.

**<u>तैवान-भूकंप</u>**

तैवानला आज पहाटे वेगवेगळ्या तीव्रतेच्या भूकंपांचे दहा धक्के बसले, ज्यामध्ये सर्वात मोठा धक्का 6 पूर्णांक 1 रिख्टर होता. या भूकंपाचं केंद्र तैवानच्या पूर्व किनारपट्टीवरील हुआलियन शहरापासून सुमारे 40 किलोमीटर अंतरावर 18 किलोमीटर खोलीवर नोंदवलं गेलं. दरम्यान या भूकंपामुळं कोणत्याही प्रकारचं नुकसान झाल्याचं वृत्त नसून भूकंपानंतर सुनामीचा इशारा देणारे कोणतेही अहवाल आले नसल्याचं माध्यमांनी म्हटलं आहे. आज बसलेले भूकंपाचे धक्के हे दोन आठवड्यापूर्वी तैवानमध्ये झालेल्या 7 पूर्णांक 4 रिख्टर तीव्रतेच्या मुख्य भूकंपानंतरचे धक्के होते असं तैवान सरकारनं म्हटलं आहे.

**<u>मणिपूर- सीआरपीएफ</u>**

मणिपूरमध्ये सशस्त्र हल्लेखोरांनी केलेल्या गोळीबारात सीआरपीएफच्या दोन जवानांना वीरमरण आलं तर अन्य दोन जण जखमी झाले आहेत. यामध्ये एक उपनिरीक्षक आणि एका हेड कॉन्स्टेबलचा समावेश आहे. बिष्णुपूर जिल्ह्यातल्या मोइरांग पोलिस स्टेशन हद्दीतल्या नरन सेना गावात काल मध्यरात्री पाऊण वाजेच्या सुमारास ही दुर्घटना घडली. हल्ला झाला तेव्हा सीआरपीएफचे जवान मितेई गावांजवळील नाक्यावर तैनात होते. घटनास्थळी सुरक्षा दलांच्या अतिरिक्त तुकडीनं तत्काळ धाव घेत शोधमोहीम सुरू केली आहे.

**<u>संस्कृत-उपराष्ट्रपती</u>**

संस्कृत ही देव भाषा असून ती आपल्या अध्यात्माच्या आणि परमात्म्याचा शोधाच्या प्रवासात एक पवित्र सेतू म्हणून काम करते, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं. ते काल तिरूपती इथल्या राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाच्या तिसऱ्या दीक्षांत सोहळ्यात बोलत होते. मानवी संस्कृतीच्या प्रवासात संस्कृत भाषेनं भक्कम आधारस्तंभाच्या रुपानं काम केलं आहे, असं

सांगत भारतीय ज्ञान प्रणालीच्या पुनरुज्जीवनासाठी आणि प्रसारासाठी राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठासारख्या संस्थांची भूमिका महत्वाची असल्याचंही उपराष्ट्रपती यावेळी म्हणाले. संस्कृत भाषेचा समृद्ध वारसा आणि आधुनिक शैक्षणिक गरजांमधील अंतर भरून काढण्यासाठी नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम विकसित करण्याचं तसंच आंतरविद्याशाखीय संशोधनाला चालना देण्याचं आवाहनही उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं.

**डिजीलॉकर**

डिजिटल इंडिया कार्यक्रमांतर्गत भारतीय वायु दलानं डिजीलॉकर व्यासपीठाशी एकात्मीकरण करून आपला परिवर्तनशील डिजिटल प्रवास सुरु केला आहे. डिजीलॉकरशी एकीकरण करून भारतीय हवाई दलातील विविध प्रक्रिया सुव्यवस्थित करणार आहे. यामध्ये अग्निवीर वायु भरतीचाही समावेश असून उमेदवाराच्या शैक्षणिक दस्तऐवजांची डिजिटल पद्धतीनं पडताळणी केली जाईल. डिजीलॉकरच्या सुरक्षित आणि उपलब्ध होण्याजोग्या दस्तऐवज भांडार सेवांचा लाभ घेण्यासंदर्भात वायु दल आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

**नौदल-सराव**

रॉयल नेव्हीच्या दक्षिण समुद्रातील युके लिटोरल प्रतिसाद गटाचा एक भाग म्हणून भारतीय नौदलाच्या INS सह्याद्री या स्वदेशी नौकेनं गुरुवारी RFA आर्गस आणि RFA लाईम बे सह, संयुक्त सागरी सरावात भाग घेतला. या सरावामुळे दोन्ही नौदलांना सर्वोत्तम सरावांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळाली. हा सराव सागरी क्षेत्रातील भागीदारी मजबूत करण्याची भारतीय नौदलाची वचनबद्धता दर्शवणारा आहे.

**चारधामयात्रा**

चार धाम यात्रेसाठीची सर्व तयारी पूर्ण झाली असून यंदा सुमारे 16 लाख भाविकांनी या यात्रेसाठी नोंदणी केली असल्याचं उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी काल माध्यमांशी बोलताना सांगितलं. चार धामयात्रेत, यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ आणि बद्रीनाथ या चार तीर्थस्थळांना भाविक भेट देतात.

**निधन**

महाराष्ट्र राज्याचे माजीसाखर आयुक्त अरविंद रेड्डी यांचं काल पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. ते 84 वर्षांचे होते. रेड्डी यांनी धुळे आणि ठाणे इथं जिल्हाधिकारी म्हणून काम केलं होतं. साखर आयुक्त पदाच्या त्यांच्या कारकिर्दीत पुण्यातील साखर संकुलाची वास्तू आकाराला आली होती. निवृत्तीनंतर ते दीर्घकाळ मुंबई मॅरेथॉनशी संलग्न होते.

**हवामान**

ओडिशा आणि पश्चिम बंगालमधील गंगा नदीच्या आसपासच्या भागात येत्या काही दिवसांत उष्णतेची तीव्र लाट येण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं व्यक्त केला असून तिथं अतिदक्षतेचा इशारा जारी केला आहे. बिहार, झारखंड, तेलंगण, रायलसीमा, कर्नाटकाचा आतील भाग, तामिळनाडू, पूर्व उत्तर प्रदेश, केरळ, माहे, कोकण, पश्चिम उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीच्या भागात 30 तारखेपर्यंत उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार